REVIEW OF RESEARCH

# मृत्युंजय – एका दुर्लक्षित नायकाची कथा

ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 5.7631(UIF)
UGC APPROVED JOURNAL NO. 48514
VOLUME - 8 | ISSUE - 8 | MAY - 2019




डॉ. हरिश्चंद्र मधुकर गायकवाड

मराठी विभाग प्रमुख
शिक्षणमहर्षी गुरूवर्य रा.गे.शिंदे महाविद्यालय,परांडा,
तालुका –परांडा जिल्हा.उस्मानाबाद.

## प्रस्तावना.

शिवाजी सावंत यांनी लिहिलेल्या 'मृत्यूंजय' या कादंबरीस मराठी साहित्यामध्ये मानाचे स्थान प्राप्त झाले आहे. त्यांनी आपल्या लेखनीतून महाभारतातील एक दुर्लक्षित नायकाला सर्वासमोर अतिशय समर्पक शब्दांत व प्रभावी पद्धतीने मांडले आहे. 'मृत्यूंजय' या कादंबरीची समीक्षा ब–याच साहित्यकांनी आपापल्या शैलीने मांडली आहे. यावरूनच 'मृत्यूंजय ही कादंबरी किती उच्च दर्जाची साहित्य निर्मिती आहे हे मराठी रसीक श्रोत्यांना कळते. मराठी साहित्यात मैलाचा दगड ठरलेली ही कादंबरी आहे. अशी कोणती वैशिष्टे या कादंबरी लेखनात आहेत ज्यामुळे ही कादंबरी मराठी साहित्य विश्वात अजरामर ठरली  हे पाहणे महत्वाचे आहे.

## 'मृत्यूंजय' कादंबरी लेखनातील वैशिष्टे

१. शिवाजी सावंत यांली लिहिलेली 'मृत्यूंजय' ही कादंबरी मराठी साहित्य विश्वात विशेष प्रसिद्ध झाली कारण ही कादंबरी महाभारतातील कर्ण या व्यक्तीरेखेवर आधारित आहे . 'कर्ण' हा महाभारतातील खलनायक म्हणूनच भासत होता परंतु शिवाजी सावंत यांनी कर्णाचे जीवन चरित्र आपल्या कादंबरीतून मांडले आणि त्याला नायक बनविले.

२.'मृत्यूंजय' ही कादंबरी महावीर कर्ण यांच्या असामान्य व्यक्तिमत्वाचा मागोवा घेते. ही कादंबरी येण्याअगोदर कर्ण म्हणजे महाभारतातील एक खलनायकी स्वरूपाचे पात्र म्हणूनच रंगविण्यात आले होते परंतु 'मृत्यूंजय' वाचल्यानंतर कर्णाविषयी सहानुभूती व प्रेम वाचकांच्या मनात निर्माण होते. कर्णाचे जीवन नव्याने उलगडण्याचा यशस्वी प्रयत्न मृत्यूंजय या कादंबरीने केला.

३.'मृत्यूंजय' ही कादंबरी मराठी साहित्य विश्वात अनेक कारणांमुळे वेगळी ठरते. कर्णाची गोष्ट ही महाभारतातील विविध पात्रांच्या मुखातून येते. कर्णाचा जीवनपट या सर्व पात्रांच्या माध्यमातून उलगडण्याचा जातो.

४.'मृत्यूंजय' या कादंबरीच्या माध्यमातून शिवाजी सावंत यांनी अनेक बारीक–सारीक गोष्टींचा उलगडा केला आहे. कर्ण हा महाभारतातील सर्वश्रेष्ठ योद्धा होता तर मग तो कौरवांकडून का लढला? अधर्माची साथ त्याने का दिली? पांडवांविरूद्ध तो का लढला? आभिमन्यूला मारताना त्यातला नायक कोठे गेला? अश्या अनेक प्रश्नांची उत्तरे वाचकांस ही कादंबरी वाचत असताना मिळतात. कर्णासोबत घडलेल्या महत्वाच्या घटना सर्वांनाच माहिती आहेत पण असे बरेच प्रश्न नेहमी वाचकांना तसेच जनसामान्यांना भेडसावत होते. या सर्व प्रश्नांची उत्तरे 'मृत्यूंजय' ही कादंबरी वाचल्यानंतर वाचकांना मिळतात. एक वेगळेच वैचारीक समाधान वाचकांना मिळते हेच खरे या कादंबरीचे यश म्हणावे लागेल.

५.या कादंबरीचे आणखी एक महत्वाचे वैशिष्टये म्हणजे शब्दांकन. अतिशय अप्रतिम असे शब्द गुंफण ही कादंबरी वाचकांसमोर मांडली आहे. कायम स्मरणात राहतील अशी वाक्य 'राधेय' चा जीवनपट मांडताना वापरली आहेत.

६.'कर्ण ',महाभारत,कौरव,पांडव यांच्या ब—याच कथा वाचकांना माहिती आहेत तरी देखील 'मृत्यूंजय' वाचत असताना ब—याच माहिती असलेल्या गोष्टी नव्याने उलगडत जातात वाचक चिंतन करण्यास प्रवृत्त केला जातो. शिवाजी सावंत यांनी या कादंबरीचे लेखन अतिशय अभ्यासपूर्ण पद्धतीने केले आहे. वाचकांना ही कादंबरी आपल्या प्रेमात पाडते. वाचक ही कादंबरी वाचकाचे पूर्ण भावविश्व व्यापून टाकते. यातच या कादंबरीच्या लेखकाचे व त्यांच्या लेखनीचे यश म्हणावे लागेल.

७.या कादंबरीचे लेखन करत असताना कर्ण हेच केंद्रस्थानी असणारे पात्र आहे परंतु कर्णाला न्याय देत असताना इतिहासातील इतर पात्रांवर लेखकाने अन्याय होवू दिला नाही. हे देखील लेखकाचे कौशल्य म्हणावे लागेल. ऐतिहासिक कादंबरी लिहित असताना खूप जबाबदारीने शब्दांची,वाक्यांची रचना करावी लागते. या सर्व कसोटयांवर लेखक शिवाजी सावंत  खरे उतरले आहेत. त्यामुळेच ही कादंबरी कित्येक काळ वाचकांचे मनोरंजन करत आहे. व पुढेही करत राहील.

८.या कादंबरीद्वारे एका दुर्लक्षीत नायकाला त्याला अपेक्षीत असणारा न्याय मिळवून देण्याचा प्रयत्न लेखकाने या कादंबरीद्वारे करून दिला आहे. कर्ण सर्वांना नव्याने समजतो,उमगतो कर्णाविषयी आपुलकी व सहानुभूती वाचकांच्या मनामध्ये निर्माण होते. तो महाभारतातील एक दुर्लक्षीत नायक आहे याची जाणीव सर्व वाचकांना होते.

शिवाजी सावंत लिखित 'मृत्यूंजय' या कादंबरीस १९९५ रोजी 'भारतीय ज्ञानपीठ' या संस्थेतर्फे मूर्तीदेवी पुरस्कार जाहीर झाला महावीर,दानशूर कर्ण ही व्यक्तिरेखा मांडत असताना लेखकाने एक अजरामर कृती वाचकांच्या हाती दिली. कादंबरीत असणारी पात्रे,कथा,घटना,प्रसंग ,संवाद इत्यादी सर्वच बाबतीत ही एक उत्तम कलाकृती मराठी साहित्यविश्वातली ठरते. आजही वाचक तेवढयाच तन्मयतेने ही कादंबरी वाचतात यातच या कादंबरीचे यश आहे.

## संदर्भग्रंथसूची

www.mrutunjaysamiksha.wikaspaidia